# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.08.2025** **वार:शुक्रवार**

---

1. छत्रपती संभाजीनगर-रभणी रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासह देशातल्या चार रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
2. ईव्हीएममध्ये छेडछाड अशक्य असल्याचं निवडणूक आयोगाच्या तपासणीतून पुन्हा एकदा सिद्ध
3. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातल्या 7 आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता
4. अलमट्टी धरणाची उंची वाढवण्यास परवानगी देऊ नये-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांना विनंती
5. राज्यातले मंत्री दत्तात्रय भरणे आणि माणिकराव कोकाटे यांच्याकडील खात्यांची अदलाबदल आणि
6. इंग्लंडविरुद्धच्या ओव्हल कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची निराशाजनक सुरुवात

**रेल्वेमार्ग**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीनं काल रेल्वे मंत्रालयाच्या 4 प्रकल्पांना मान्यता दिली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर-परभणी मार्गाचं दुहेरीकरण करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. तसंच इटारसी-नागपूर मार्गावर 4 थी मार्गिका वाढवण्यात येणार आहे. या चार प्रकल्पांसाठी सुमारे 11 हजार 169 कोटी रुपये इतका खर्च येणार आहे. या प्रकल्पांबद्दल बोलतांना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले....

**छत्रपति संभाजी नगर के से लेके परभनी तक 177 किलोमीटर की सिंगल लाइन है। उसकी डबलिंग का प्रपोजल आज अप्रूव हुआ है 2179 करोड रुपीस के लिए और जो इस आरिया में कई सारी इंडस्ट्रीज है और खासकर मराठवाड़ा में जहाँ इंडस्ट्रियल ग्रोथ की जरूरत है कई । स्मॉल एंड मीडियम इंडस्ट्रीज हैं जिनको पोर्ट से कनेक्टिविटी चाहिए तो आपको ध्यान होगा कुछ समय पहले जालना जलगांव प्रोजेक्ट भी एक सैंक्शन किया था। वैसा ही ये इम्पोर्टेंट प्रोजेक्ट से प्रोजेक्ट है जो जालना के ड्राई पोर्ट को कनेक्ट करता है और काफी सारे जो मराठवाड़ा के क्षेत्र हैं इंडस्ट्रियल एरियाज है उसको कनेक्ट करते है।**

प्रधानमंत्री कृषी संपदा योजनेसाठी सुमारे साडे 6 हजार कोटी रुपये आणि National Cooperative Development Corporation ला 2 हजार कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णयही केंद्रीय मंत्रीमंडळानं काल घेतला.

**गोयल**

भारतातून आलेल्या वस्तूंवर 25 टक्के कर लादण्याची घोषणा अमेरिकेनं केल्यानंतर भारत सर्व बाजूंचा अभ्यास करत असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल लोकसभेत सांगितलं. ते म्हणाले...

**वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय निर्यातकों और उद्योग सहित सभी हितधारकों से संवाद कर इस विषय पर उनके आकलन की जानकारी ले रहा है। सरकार हमारे किसानों, श्रमिकों, एंटरप्रेन्यर्स, निर्यातकों, सूक्ष्म, लघु और मध्यम उद्योगों और उद्योग जगत के सभी हितधारकों के कल्याण की रक्षा और संवर्धन को सर्वोच्च महत्व देती है।**

भारत आणि अमेरिका गेल्या काही महिन्यांपासून निष्पक्ष, संतुलित आणि परस्परांना लाभदायक व्यापार करार करण्यासाठी वाटाघाटी करत आहेत, असं गोयल यांनी सांगितलं.

**ईव्हीएम**

महाराष्ट्र विधानसभेच्या 2024च्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर करण्यात आलेल्या ईव्हीएम तपासणी आणि पडताळणी प्रक्रियेत सर्व यंत्रं योग्य स्थितीत असल्याचं भारत निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. 10 उमेदवारांच्या विनंतीनंतर भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी 10 विधानसभा मतदारसंघांमधील मतदार युनिट, नियंत्रण यंत्र आणि व्हीव्हीपॅट यांची तपासणी केली. सर्व यंत्रांनी चाचण्या उत्तीर्ण केल्या असून ईव्हीएममध्ये कोणत्याही प्रकारे छेडछाड करता येत नाही, हे सिद्ध झालं; त्यामुळे निकालांबाबत शंका घेण्याचं कारण नाही, असं भारत निवडणूक आयोगानं एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितलं आहे.

**मालेगाव बॉम्बस्फोट**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातल्या सर्व सात आरोपींची काल राष्ट्रीय तपास संस्थेच्या विशेष न्यायालयानं सबळ पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. माजी खासदार प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित तसंच निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा यामध्ये समावेश आहे. मालेगावमध्ये 2008 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात 6 जणांचा मृत्यू झाला होता; तर 100हून अधिक जण जखमी झाले होते. दहशतवाद विरोधी पथकानं प्राथमिक तपास केल्यानंतर हा तपास एनआयएकडे सोपवण्यात आला होता.

या निकालानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, दहशतवाद कधीच भगवा नव्हता आणि नसेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या निकालावर कॉंग्रेसनं प्रश्नचिन्ह उपस्थित केलं असून दहशतवादाला रंग नसतो, अशी प्रतिक्रिया कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दिली आहे. मालेगावात या निकालावर संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

**अलमट्टी**

कृष्णा नदीवरील अलमट्टी धरणाच्या जलाशयाच्या पातळीची उंची वाढविल्यास महाराष्ट्रातल्या सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांसह, कृष्णा नदी काठच्या परिसराला फटका बसू शकतो. त्यामुळे अलमट्टीची उंची वाढवू नये, यासाठी कर्नाटक सरकारला निर्देश द्यावेत, अशी विनंती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांना पत्राद्वारे केली आहे. अलमट्टी जलाशयाची उंची 6 मीटरनं वाढवण्याचा कर्नाटक शासनाचा निर्णय आमच्यासाठी अत्यंत चिंताजनक असल्याचं फडणवीस यांनी पत्रात म्हटलं आहे.

**खातेबदल**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषी खातं काढण्यात आलं असून ते मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे सोपवण्यात आलं आहे. तर, मंत्री भरणे यांच्याकडची क्रीडा, युवक कल्याण आणि औकाफ ही खाती माणिकराव कोकाटे यांना देण्यात आली आहेत.

**पीएमपी**

पुणेकरांच्या दैनंदिन प्रवासातील महत्त्वाचा भाग असलेल्या पीएमपीची बससेवा आता एआयच्या मदतीने अधिक सुरक्षित, स्मार्ट आणि पारदर्शक होणार आहे. ऐकूया एक वृत्तांत....

**पुण्यातील सार्वजनिक वाहतुकीसाठी अत्यंत महत्वाची व्यवस्था म्हणजे पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात-पीएमपी. या पीएमपी बससेवेने आता आणखी एक पाऊल प्रगत तंत्रज्ञानाच्या दिशेने उचलले आहे. लवकरच पीएमपीच्या बसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, म्हणजेच एआयवर आधारित कॅमेऱ्यांचा वापर करण्यात येणार आहे. या कॅमेऱ्यांपैकी एक कॅमेरा बसच्या चालकाजवळ लावण्यात येणार आहे, ज्यामुळे चालकाच्या हालचालींवर देखील नियंत्रण ठेवता येणार आहे. मागील काही अपघात चालकांच्या चुका आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन यामुळे झाले असल्याची नोंद आहे. अशा घटनांवर आळा घालण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय आहे. तसेच, बसमध्ये प्रवाशांची नेहमीच मोठी गर्दी असते.**

**अनेक वेळा काही प्रवासी विनातिकीट प्रवास करताना दिसतात. आता बसमध्ये बसवण्यात येणारे एआय कॅमेरे प्रवाशांची संख्या मोजतील आणि ती माहिती वाहकाला देतील.या तंत्रज्ञानामुळे पीएमपीची सेवा अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि कार्यक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. शिवराज सणस आकाशवाणी बातम्यांसाठी पुणे.**

**टिळक पुण्यतिथी**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना देशभरातून आदरांजली वाहिली जात आहे. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराचं आज पुण्यात वितरण होणार आहे; ज्येष्ठ नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**अण्णाभाऊ साठे जयंती-सांगली**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना राज्यात सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या सांगली जिल्ह्यातल्या वाटेगाव इथल्या प्रस्तावित स्मारकाच्या जागेच्या बाबतीतले सर्व दावे इस्लामपूर न्यायालयानं फेटाळून लावले आहेत. त्यामुळे इथं अण्णाभाऊ साठे यांचं आंतरराष्ट्रीय दर्जाचं स्मारक उभारण्याचा राज्य सरकारचा मार्ग मोकळा झाला आहे. या स्मारकासाठी 25 कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

**मेढे-निधन-नागपूर**

राष्ट्र सेविका समितीच्या माजी प्रमुख संचालिका प्रमिलाताई मेढे यांचं काल नागपूरमध्ये वृद्धापकाळानं निधन झालं. त्या 97 वर्षांच्या होत्या. प्रमिलताईंच्या इच्छेनुसार त्यांचा देह एम्स रुग्णालयाला दान करण्यात येणार आहे. राष्ट्र सेविका समितीच्या माध्यमातून त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी भरीव कार्य केलं. 1978 पासून कार्यवाहिका म्हणून तर 2003 ते 2006 या काळात प्रमुख संचालक पद त्यांनी भूषवलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रमिलाताई यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतील पाचवा सामना कालपासून लंडनच्या ओव्हल मैदानावर सुरु झाला. या मालिकेत सलग पाचव्यांदा नाणेफेकीचा कौल यजमान संघाच्या बाजूने लागला; आणि त्यांनी भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं; भारताच्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली. काल दिवसअखेर भारताच्या 6 गडी बाद 204 धावा झाल्या होत्या. करूण नायरनं अर्धशतकी खेळी करत भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला; आज नायर आणि सुंदर भारताचा डाव पुढे सुरु करतील.

**हवामान**

राज्यात काही ठिकाणी पावसाच्या सरी पडत असून आजही राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. विदर्भात काही ठिकाणी विजांसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार